# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

**Dr. Priya Gedam**
Director (I/C)
(Department of Students'Devolopment

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : nssdsw.gug@ gmail.com

पत्र क्र. No.GU/DSD / 176/2017

Dt: 30 /11/2017

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठ संलग्नित
सर्व महाविद्यालये.

**विषय : माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर आंतरविद्यापीठीय मराठी वक्तृत्व स्पर्धा २०१७–२०१८.**

संदर्भ :– सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे पत्र क्र. विविमं/२०१७–१८/४२४, दि. १/११/२०१७.

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर आंतरविद्यापीठीय मराठी वक्तृत्व स्पर्धा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करीत आहे. स्पर्धेची अंतीम फेरी **शनिवार दि. ०९ डिसेंबर, २०१७** रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात क्लासरुम कॉम्प्लेक्स येथे आयोजित केली आहे. विद्यापीठामध्ये या स्पर्धेची उपांत्य फेरी घेवून निवड करण्यात आलेल्या एका विद्यार्थ्यांचे नामनिर्देशन मराठी अंतीम फेरीसाठी करावयाचे आहे.

करिता आपण आपल्या महाविद्यालयामध्ये सदर स्पर्धा आयोजित करुन एका विद्यार्थ्याचे नांव मोबाईल क्रमांकसह **दि. ०३ डिसेंबर २०१७** पूर्वी संचालक विद्यार्थी विकास यांचे कार्यालयात पाठविण्याचे करावे.

कळावे.

धन्यवाद !

(डॉ. प्रिया गेडाम)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

सहपत्र : स्पर्धेची नियमावली

# : मराठी वक्तृत्त्व स्पर्धेची नियमावली :

१) स्पर्धेचे नाव : माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर आंतरविद्यापीठीय मराठी/इंग्रजी वक्तृत्त्व स्पर्धा.

२) ही वक्तृत्त्व स्पर्धा महाराष्ट्रातील कृषी व अकृषी विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी खुली राहील व ते या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील.

३) या स्पर्धेसाठी पाच विषय असतील, प्रत्येक स्पर्धकाला त्यांचा विषय अर्धा तास आधी देण्यात येईल.

४) स्पर्धकांचा क्रम मराठी आकारविल्हे याप्रमाणे (Alpabetical) राहील.

५) स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची निवड करण्याची पद्धत खालीलप्रमाणे :

अ) आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालयातील प्रत्येकी एका विद्यार्थ्यांमधून वक्तृत्त्व स्पर्धेची उपांत्य फेरी घेण्याची जबाबदारी त्या त्या विद्यापीठांवर असेल.

ब) प्रत्येक विद्यापीठाच्या उपांत्य फेरीच्या विजेत्याला अंतिम फेरीसाठी **०९ डिसेंबर, २०१७** या तारखेला अंतिम फेरीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये उपस्थित रहावे लागेल.

क) उपांत्य फेरीमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यास बोलण्यासाठी पाच मिनिटे (४ + १) वेळ देण्यात येईल. चार मिनिटांनंतर पूर्वसूचनेची घंटा वाजविण्यात येईल.

ड) अंतिम फेरीमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यास बोलण्यासाठी सात मिनिटे (५ + २) वेळ देण्यात येईल. पाच मिनिटांनंतर पूर्वसूचनेची घंटा वाजविण्यात येईल.

इ) अंतिम स्पर्धेत गुणानुक्रमे दोन विद्यार्थी निवडले जातील. प्रथम व द्वितीय क्रमांकास अनुक्रमे रू. ५०००/– व रू. २०००/– चे रोख पारितोषिक, तसेच गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील.

ई) मराठी वक्तृत्त्व स्पर्धेच्या अंतिम फेरीतील प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी प्रदान समारंभात पारितोषिक व गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.